~~श्री/श्रीमती/सौ.~~ **डी. वाय. डेव्हलपर्स तर्फे भागीदार - १) श्री मनोज बाबुराव येगीनवार, २) श्री आशीष रमेश दासरवार** यांचा तारीख **०३/१२/२०१५** रोजी परवानगी मिळणेकरिता केलेला अर्ज.

---

क्रमांक - चंशमनपा/न.र/बां.पर/ **२५२** /२०१५
दिनांक - 13/07 / २०१६

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

## ☆ प्रारंभ - प्रमाणपत्र ☆

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २५३ अन्वये)**

~~श्री/श्रीमती/~~सौ. **डी. वाय. डेव्हलपर्स तर्फे भागीदार - श्री मनोज बाबुराव येगीनवार व ईतर, रा. चंद्रपूर** मौजा / ~~मोहल्ला~~ **वडगांव,** सर्व्हे/ ~~शिट~~ क्र. **७५/१,** ब्लॉक क्र. ---------- प्लॉट क्र. **१७,१८** या चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील आपले मालकीचे कब्जातील जागेत ---------------- रंगात आराखडयामध्ये दूरुस्ती दर्शविल्याप्रमाणे **निवासाकरीता कम्पाऊंड वॉलसह (फ्लॅट स्किमचे प्रस्तावित ईमारतीचे बांधकाम - वसंत विला)** इमारतीचे बांधकामास पुढील अटी शर्तीस अधीन राहुन बांधकामास परवानगी देण्यांत येत आहे.

**ईमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत उपकराचा युनिक क्रमांक -**

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ० | १ | ५ | ३ | ३ | ३ | ३ | २ | ० | ३ | ० | २ | ५ | २ | ० | ० |

## -- अटी व शर्ती --

०१) सदरचे प्रमाणपत्र निर्गमित केलेल्या तारखेपासून एक वर्ष वैध असेल. मुदतीत बांधकाम पूर्ण न झाल्यास परवानगीची मुदत वाढविणेसाठी विहीत मुदतीत मुदतवाढ प्राप्त करुन घ्यावी.

०२) सदरहू बांधकामामुळे भविष्यांत महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये अगर अन्य कोणत्याही सार्वजनिक कार्यास अडथळा/ बाधा निर्माण झाल्यास बांधकाम तुमचे खर्चाने काढून घ्यावे लागेल. त्या बद्दल नुकसान भरपाई मिळणार नाही.

०३) बांधकाम मंजूर केलेल्या आराखडयाप्रमाणे आणि नमुद अटी प्रमाणे करणे बंधनकारक राहील.

०४) बांधकामाचे मटेरियल (जसे - बांधकामाची रेती, गिट्टी, विटा) सार्वजनिक ठिकाणी महानगरपालिकेच्या स्वतंत्र लेखी परवानगी शिवाय टाकलेले आढळून आल्यास त्यापोटी विहीत शुल्क जमा केले शिवाय ज्योत्यानंतरची पुढील परवानगी दिली जाणार नाही.

०५) बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करणे आवश्यक राहील. बांधकामामध्ये हलके मटेरियल, गवत, गारा, वगैरे वापरता येणार नाही.

०६) इमारतीचे सांडपाणी महानगरपालिकेची गटार लगत असल्यास महानगरपालिकेचे गटारीस महानगरपालिकेची लेखीपुर्व परवानगी घेवून रितसर अनामत व सांडपाणी जोडणी शुल्क रक्कम भरुन सोडावे. लगत गटार नसल्यास स्वतःचे मालकीचे जागेतच सोकपीट बांधून ती व्यवस्था करावी. व लगतच्या इतर भुखंडावरील विहीर, बोरींग इ. जलस्त्रोत विचारात घेऊन त्यापासुन किमान ६ मि. अंतरावर सोकपीटची जागा ठरवावी कोणत्याही सार्व. ठिकाणी अथवा इतरांचे जागेत सांडपाणी सोडल्याचे आढळून आल्यास सदर परवानगी रद्द झाल्याचे समजण्यांत येईल.

०७) मंजूर प्लॅन प्रमाणेच बांधकाम करावे. त्याव्यतिरिक्त जादा बांधकाम अथवा कोणतेही बदल केल्याचे निदर्शनास आलेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार निष्कासनाची कारवाई करण्यांत येईल. व गुन्हा दाखल करणे तसेच दंड व निष्कासनाचा झालेला खर्च

११) कोणत्याही परिस्थितीत बांधकाम बंद करण्याचा अगर चालू करण्याचा अधिकार आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

१२) रेनवॉटर हर्वेस्टींग करीता इमारतीचे छतावर पडणारे पावसाचे पाणी बाहेर वाहून नेणारा ६ (सहा इंच) व्यासाचा सछिद्र पि.व्ही.सी. पाईप हा कमीत कमी ३० फुट जमिनीचे आंत बोअर करुन टाकण्यात यावा. जेणे करुन छतावर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत जिरवता येवून जमिनीखालील पाण्याची पातळी उंचविण्यास मदत होईल. सदरची खात्री पटवावी अन्यथा वापर परवानगी दिली जाणार नाही. सदर व्यवस्था केली नसल्याचे आढळून आल्यास आपणांस दिलेली बांधकाम परवानगी रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

१३) जोत्यानंतरचे (प्लिंथ) बांधकाम झाल्यावर म.न.पा.कडे पुढील बांधकामासाठी परवानगी मिळणेसाठी अर्ज करावा. जोत्यानंतरची बांधकाम परवानगी घेतलेली नसल्यास इमारत अनाधिकृत समजण्यात येईल.

१४) सदर बांधकामात शक्यतो फ्लॉय ॲश विटा व फ्लॉय ॲश आधारित साहित्याचा वापर केला असले बाबत म.न.पा.ची खात्री पटविल्या शिवाय पुढील परवानगी मिळणार नाही.

१५) सौर उर्जेचा वापर प्रभाविपणे होण्याचे दृष्टीने गरम पाणी करण्याचे उपकरणे **B/S** स्पेसीफीकेशन **IS 2933** प्रमाणे इमारतीवर बसविणे आवश्यक राहील त्याबाबत म.न.पा.ची खात्री पटविल्या शिवाय पुढील वापर प्रमाणपत्र मिळणार नाही.

१६) सदर बांधकाम परवानगीची प्रत बांधकाम सुरु असे पर्यंत बांधकाम स्थळावर सहज दिसेल अशा ठिकाणी लावण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

१७) सार्वजनिक वापराच्या सर्व कार्यालयीन तसेच संस्थात्मक इमारती मध्ये अपंग नागरिकांना प्रवेश करण्यासाठी पायऱ्या शेजारी पुरेशा रुंदीचा व योग्य उताराचा रैम्प बांधने आवश्यक राहील. आधाराकरीता रेलींग व्यवस्था करावी, तसेच अंध नागरिकांसाठी ब्रेल लिपीत सुचना फलक लावणे आवश्यक राहील.

१८) सदर इमारत पुर्ण झाल्यानंतर त्याचा वापर करणाऱ्या नागरिकांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे ओला व सुखा कचरा वेगवेगळा साठवून विल्हेवाट लावणेची आहे. विशेषतः अपार्टमेंट / वाणिज्य इमारती मधील ओला व सुखा कचरा विल्हेवाट लावणेसाठी जागा व तंत्रज्ञान निश्चीत करुन त्या प्रमाणे काम केलेली खात्री पटवावी त्याशिवाय पुढील परवानगी मिळणार नाही. अशी व्यवस्था केली नसल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.

१९) पिण्याऐवजी इतर कारणासाठी पाण्याचा पुर्नवापर करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पाईपलाईन व पाणी साठवण यंत्रणा उभारणे आवश्यक राहील.

२०) सदर बांधकाम करतेवेळी भारतीय मानक संस्थेने निश्चीत केलेल्या मानक क्र. **IS** १८९३/१९८४, **IS** ४३२६/१९९३, **IS** १३८२७/१९९३, **IS** १३८२८/१९९३, **IS** १३९२०/१९९३, **IS** १३९३५/१९९३ प्रमाणे भुकंप रोधक बांधकाम करुन त्या प्रमाणे अनुज्ञाप्ती बांधकाम अभियंताकडून प्रमाणपत्र घेऊन पुर्णत्वाच्या दाखल्यासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

२१) अग्नीशामन व्यवस्था नियमाप्रमाणे करणे व त्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

२२) प्रस्तावित बांधकामाखालील जागेचे मालकी हक्क सिध्द् करण्याची जबाबदारी आवेदकाची राहील. तसेच जागेच्या मालकी हक्काबाबत वाद उपस्थित झाल्यास ही शिफारस रद्द समजण्यांत येईल.

वरील पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यावर सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदारावर राहील व त्यापोटी कोणतीही नुकसान भरपाई म.न.पा कडून देय राहणार नाही.

ठिकाण : **चंद्रपूर**

दिनांक : 93 / 09 / २०१६

93/9/16

**आयुक्त**

चंद्रपूर शहर महानगरपालिका,

चंद्रपूर